# श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,मालेगांव कॅम्प नासिक

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## स्वच्छ भारत स्वस्थ भारत

### दि.१८/१२/२०१७ ते २४/१२/२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षातील राष्ट्रीसेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे दाभाडी, रोकडोबा नगर या गावी घेण्यात आले . सदर दाभाडी, रोकडोबा नगर हे गावठाण जमीनीवर वसलेले कष्टकरी, असंघटीत, कारागीर,कामगार वस्तीचे गांव आहे. हि वस्ती ६० % भटक्या जमाती (एस.टी.) ४० % अनुसूचीत जाती व ओ.बी.सी / एन.टी.या संवर्गातील समुहाने बनलेले आहे. शिबीराचे उद्दीष्टे स्वच्छ भारत स्वस्थ भारत या उपक्रमाणे घेण्यात आले.राष्ट्री सेवा योजनेचे ध्येय व उद्दीष्टे प्रमाणे पुढील सात दिवशीय श्रम व ज्ञान संस्कार कार्यक्रम घेण्यात आले.

१) दि. १८/१२/२०१७ रोजी दाभाडी रोकडोबा नगर येथील श्री क्षेत्र हनुमान मंदीर परिसरात शिबीराचे उदघाटन मा.डॉ. अव्दव (आबा) हिरे (पाटील) चेअरमन नाशिक जिल्हा औदयोगिक संघ व समन्वयक महात्मा गांधी विद्यामंदीर नाशिक, यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणुन मा. प्रकाश सावकार(पोलीस निरीक्षक कॅम्प पोलीस स्टेशन)यांनी प्रभावशाली व स्वयंशिस्त राष्ट्राची निर्मीती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची भुमिका महत्वाची असते. समाज सेवा हीच ईश्वर सेवा असुन असामाजिक ,अनैतिक वर्तनांचे मुळ अनेक गोष्टी असु शकतात, विद्यार्थीनींनी शिक्षण घेत असतांना चांगल्या गोष्टींचा स्विकार करावा. असे मत मा.सावकार यांनी प्रकट केले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.प्राचार्य डॉ.उज्वला देवरे होत्या. या कार्यक्रम प्रसंगी श्रमदानातुन शारीरिक व मानसिक स्वास्थ चांगले राहते. स्ववंलबनाचा महत्वाचा धडा रासेयो शिबीरातुन मिळतो. बदलेल्या काळानुसार व्यावरिकता ग्रामीण माणसानमध्ये रूजवणे आवश्यक आहे. असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व्यक्त केले. या कार्याक्रमासाठी उपप्राचार्या नवनीता देसले, मा.सरपंच सौ.चारूशिला निकम, उपसरपंच सौ संगिता निकम, ग्रामविकास अधिकारी डी.डी. बनकर, ग्रामपंचायत सदस्य शुभाष नहिरे, महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकारी दिलीप पवार,सहकार्यक्रम अधिकारी डॉ.रमेश निकम व डॉ.राजश्री सावंत उपस्थित होते. दुपारच्या सत्रात प्रा.नवनिता देसले मॅडम व प्रा.डॉ.एस.डी.खैरनार यांनी ग्राम स्वच्छता व गावचा इतिहास या विषयावर प्रबोधन केले.

२) दि.१९/१२/२०१७ रोजी सकाळी ग्रामस्वच्छता फेरी काढण्यात आली व गांवाचा परिसर स्वच्छ करण्यात आला दुपारच्या सत्रात प्रा.बी.डी.पगार यांचे जलशिवार योजना व प्रा.डॉ.एस.बी.सानप यांनी स्वच्छ भारत व युवती.या विषयावर प्रबोधन केले.

३) दि. २०/१२/२०१७ रोजी श्रीक्षेत्र हनुमान मंदीर येथे परिसर स्वच्छता अभियान राबवुन रोकडोबा नगर येथे आधार कार्ड सर्व्हे व जनजागृती करण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रा.डॉ. के.एस.अहिरे यांनी विज्ञानाधिष्ठीत दृष्टीकोन व प्रा.एम.आर.शिरसागर यांनी मुल्यशिक्षण या विषयावर प्रबोधन केले

४) दि. २१/१२/२०१७ रोजी श्रीक्षेत्र रोकडोबा मंदिर परीसरातील मंदीराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर खड्डे पडलेले होते सर्व खड्डे मुरूम टाकुण बुजवण्यात आले. व रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली. दुपारच्या सत्रात डॉ.कल्याण कोकणे यांनी रस्ता सुरक्षा अभियान व प्रा.जितेंद्र मिसर यांनी भौगोलिक माहिती प्रणाली या विषयावर व्याख्यान दिले.

५) दि. २२/१५/२०१७ रोजी सकाळी मालेगांव व सटाणा रोड वर वाहतुक पोलीस निरीक्षक मा.पुनम राऊत यांच्या हस्ते व रासेयो च्या विद्यार्थ्यीनीनी अपघात घडु नये म्हणुन रिप्लेक्टर लावण्यात आले व रॅली काढुन जनजागृती करण्यात आली. दुपार सत्रात ब्रम्हकुमारी उज्वला दिदी यांनी ,विद्यार्थी जीवनाचे महत्व या विषयावर व डॉ.विशाल खरे यांनी आरोग्य समुपदेशन या विषयावर व्याख्यान दिले


६) दि. २३/१२/२०१७ रोजी अवयव दान सर्व श्रेष्ठ दान याविषयी जनजागृती रॅली काढण्यात आली. व गाव हगणदारी मुक्त व्हावे म्हणुन गावात सर्व्हे करण्यात आला. दुपार सत्रात प्राचार्य डॉ. सौ.व्ही.डी.पगार यांचे जल व्यवस्थापन व डॉ.श्रीमती.मिना पाटील यांचे महिला सक्षमीकरण या विषयावर प्रबोधन व्याख्यान झाले.

७) दि. २४/१२/२०१७ रोजी हात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली व गावातील महिला/पुरूष वर्गाला हात स्वच्छता प्रात्यक्षिक सहभाग घेऊन जनजागृती करण्यात आली. तसेच स्वच्छता अभियान, मतदान जागृती, बेटी बचाव बेटी पढाव, व्यसन मुक्ती, या विषयी गावात पथनाट्य सादर करण्यात आले. श्रम संस्कार शिबीराचा समारोह दुपारी करण्यात आला. शिबराच्या समारोप साठी मा. श्री.बी.के.देवरे (उपाध्यक्ष –महात्मा गांधी विद्यामंदीर मालेगांव कॅम्प) व महाविद्यालयाच्या प्राचार्या उज्वला देवरे मॅडम मा.महंत नागा गरीबदास महाराज तसेच सरपंच,उपसरपंच,ग्राम सेवक ग्रामस्थ तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. या सर्व मान्यवर व रासेयो च्या स्वंयम सेविकांनी मंदीर परिसरात २५ वृक्षांची लागवड केली. या सात दिवसीय शिबीरास एन.एस.एस. विद्यार्थीनी प्रतिनीधी संजना पवार हिने सुत्र संचालन केले गावातील जनतेशी सुसंवाद सादला या शिबीरामुळे राष्ट्रीय उभारणी व ग्रामस्वच्छता ,जन-जागरणात मोलांचा हातभार लावला. प्राचार्य डॉ.सौ.उज्वला देवरे,उपप्राचार्य नवनीता देसले,कार्यक्रम अधिकारी प्रा.दिलीप पवार,प्रा.रमेश निकम,प्रा.श्रीमती. डॉ.राजश्री सावंत यांनी शिबीर यशस्वी केले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्रीमती पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य
महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प (नाशिक)

प्राचार्य
एस.पी.एच. महिला महाविद्यालय
मालेगांव कॅम्प – ४२३ १०५






रा.से.यो च्या विद्यार्थीनी श्रमदान व पथनाट्य सादर करतांना





रा.से.यो च्या स्वंय सेविका शोष खड्डे व रस्ता डागडुगी करतांना





स्वंय सेविका व प्रमुख पाहुणे बी.के.आण्णा मा.प्राचार्या वृंक्षारोपन करतांना






अवयव दान रॅली व रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत रिप्लेक्टर लावतांना मा.पुनम राऊत  व स्वंय सेविका



ग्राम स्वच्छता करतांना रासेयोच्या स्वंय सेविका

लोकमत नाशिक, बुधवार, दि. २० डिसेंबर २०१७ | ६



मालेगाव येथील महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे रोकडोबानगर येथे आयोजित श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कॅम्पचे पोलीस निरीक्षक प्रकाश सावकार. समवेत प्राचार्य उज्ज्वला देवरे आदी.

# रासेयो श्रमशिबिराचे उद्घाटन

## मालेगाव : महिला महाविद्यालयातर्फे रोकडोबानगरला आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

मालेगाव : येथील श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाचे रोकडोबानगर येथे झालेल्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन कॅम्पचे पोलीस निरीक्षक प्रकाश सावकार यांच्या हस्ते झाले. प्रभावशाली व स्वयंशिस्त राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वपूर्ण असते, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे अध्यक्षस्थानी होत्या. श्रमदानातून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. स्वावलंबनाचा महत्त्वाचा धडा राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून प्रत्येकाला मिळतो. खेड्यांविषयी सकारात्मक मानसिकता निर्माण होणे, त्याचप्रमाणे बदललेल्या काळानुसार योग्य तो शास्त्रीयदृष्टिकोन व व्यावहारिकता ग्रामीण माणसामध्ये रुजविणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

◆ श्रमदानातून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. स्वावलंबनाचा महत्त्वाचा धडा रासेयो शिबिरातून मिळतो. बदललेल्या काळानुसार व्यावहारिकता ग्रामीण माणसामध्ये रुजविणे आवश्यक आहे, असे प्राचार्य देवरे यांनी सांगितले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. दिलीप पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ग्रामपंचायत सदस्य सुभाष नहिरे, ग्रामविकास अधिकारी डी. डी. धनकर, अमोल निकम, उपप्राचार्य प्रा. नवनीता देसले, कार्यालयीन अधीक्षक शंकर चव्हाण, प्रा. भारती कापडणीस, प्रा. डॉ. खैरनार, डॉ. सानप, प्रा. क्षीरसागर, प्रा. पगार, प्रा. प्रज्ञा सुरवसे, प्रा. शिंदे, प्रा. अशोक जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजश्री सावंत यांनी केले. प्रा. डॉ. रमेश निकम यांनी आभार मानले.

---

नाशिक

# पीव्हीएच महाविद्यालयाचे रासेयो श्रमसंस्कार शिबिर

---

दैनिक दिव्य मराठी

# राष्ट्रसेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा : प्राचार्य डॉ. देवरे



---

जिल्हा विशेष

लोकमत नाशिक, बुधवार, दि. २७ डिसेंबर २०१

# महिला महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

## मालेगाव : स्वयंसेविकांकडून रोकडोबा परिसरात श्रमदान

लोकमत न्यूज नेटवर्क

मालेगाव : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर रोकडोबानगर दाभाडी येथे उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे होत्या.

रविवारी शिबिराचा समारोप करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे उपाध्यक्ष बी. के. देवरे हे होते. देवरे यांनी पारंपरिक मूल्यांची जोपासना करून स्वत:ला सुदृढ करणे, परोपकारातून आत्मिक समाधान मिळविणे, दैनंदिन दिनचर्येत श्रमाचे योग्य प्रमाण ठेवणे, माणसाचा यंत्रमानव (रोबो) होऊ न देता माणुसकीची मूल्ये जोपासणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. प्राचार्य देवरे यांनी तरुणींनी राष्ट्रविकासासाठी व्यापक दृष्टिकोनातून राष्ट्र हितासाठी कार्य करावे.

◆ राष्ट्रसेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा असून वृक्षारोपण करणे, परिसर स्वच्छ ठेवणे, नियमांचे पालन करणे, स्वयंशिस्तीने वागणे, दुसऱ्यासाठी आदर्श मानणे यातूनदेखील राष्ट्रसेवा होत असते. पारंपरिक मूल्यांची जोपासना करून स्वत:ला सुदृढ करणे, परोपकारातून आत्मिक समाधान मिळविणे गरजेचे आहे.

राष्ट्रसेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा असून वृक्षारोपण करणे, परिसर स्वच्छ ठेवणे, नियमांचे पालन करणे, स्वयंशिस्तीने वागणे, दुसऱ्यासाठी आदर्श मानणे यातूनदेखील राष्ट्रसेवा होत असते, असे मत याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. ए. पवार यांनी प्रास्ताविक व शिबिराच्या अहवालाचे वाचन करून सात दिवसात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांनी केलेली कार्ये व त्यांचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमप्रसंगी प्रांजल देशमुख, चैताली ठाकूर, पल्लवी सोनवणे, नेहा देसाई, झेंड यांनी शिबिरातील अनुभव कथन केले, तर रुपाली शेवाळे, सपना गोसावी, बोरसे यांनी एनएसएस गीत सादर केले.



मालेगाव शहरालगतच्या रोकडोबा येथे आयोजित श्रमसंस्कार शिबिरात बोलताना प्राचार्य उज्ज्वला देवरे. समवेत बी. के. देवरे, शिवाजी देवरे.

कार्यक्रमास प्रा. क्षीरसागर, प्रा. शिंदे, प्रा. एन्नावार, प्रा. शिवाजी देवरे, बी. के. पवार, शिंदे, अनिल बच्छाव, भगवान बच्छाव, तुषार भोसले, कविता पाटील, अंजना पवार, के. डी. देवरे, हिरामण आहेर आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. राजश्री सावंत यांनी शिबिर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन उन्नती बच्छाव हिने केले, तर प्रा. डॉ. रमेश निकम यांनी आभार मानले.